# खेड्या-खेड्यांत स्वराज्य

१२५५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२९२

विनोबा

REFBK-0009282

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

REFBK-0009282

# खेड्या-खेड्यांत स्वराज्य

## प्रत्येक खेड्यांत स्वराज्य

स्वराज्य मिळाल्यानंतर खेड्यांतील लोकांची स्थिति सुधारेल, अशी जनतेला आशा होती. अशी आशा राखणें चूक नव्हतें. स्वराज्यांत जर जनतेची स्थिति सुधारली नाहीं तर त्या स्वराज्याची काय किंमत ?

## आम्ही आमचे राजे

पण स्वराज्यानंतर आमची स्थिति सुधारणें आमच्या च हातांत आहे हें लोकांच्या लक्षांत आलें नाहीं. पूर्वी जसें मुसलमानांचें अथवा इंग्रजांचें राज्य होते तसें आतां काँग्रेसचें राज्य आहे; असें लोकांना वाटते. पण मुसलमानांच्या, इंग्रजांच्या किंवा आणखी कोण्या राजाच्या राज्यांत मत मागायला कोणी येत नव्हतें. तशा प्रकारचीं राज्यें आतां इतिहासजमा झालीं. आतांचें आमचें राज्य हें स्वराज्य आहे म्हणजे लोकांचें राज्य आहे. यांत जे लोक राज्य चालवितात, ते लोकांनीं निवडलेले नोकर असतात. तुमचें राज्य तुम्हांला जसें चालवायचें असेल तसें चालवा आणि त्यासाठीं कोणते नोकर ठेवायचे ते तुमचें तुम्ही च ठरवा अशी तुम्हांला सत्ता स्वराज्यामुळें देण्यांत आली आहे. मत देणें म्हणजे ही सत्ता वापरणें. एकदां तुम्हीं मत दिलें म्हणजे पांच वर्षांसाठीं तुम्ही आपल्या नोकरांची नेमणूक केली असें होतें. ज्याप्रमाणें शेतकरी शेताच्या कामासाठीं गडी ठेवतो, त्यानें चांगलें काम केलें तर त्याला पुन्हां नोकरीवर ठेवतो आणि चांगलें न केलें तर त्याच्या ऐवजीं दुसऱ्याला नोकरीवर ठेवतो. त्याप्रमाणें पांच वर्षांसाठीं तुम्ही जे नोकर निवडले त्यांचें

काम ठीक चाललें आहे, असें तुम्हांला वाटलें तर तुम्ही त्यांना पुन्हां दुसऱ्यांदा निवडाल. नाहीं तर त्यांच्या जागीं दुसऱ्यांना निवडूं शकाल.

येथें तुम्ही जे सर्वजण बसला आहां, ते सारे बादशाह आहांत, राज्याधिपति आहांत, असा याचा अर्थ होतो. परंतु तुमच्यांतील प्रत्येक व्यक्ति मात्र राज्याधिपति नाहीं. तुम्ही सर्व मिळून राज्याधिपति आहां. परंतु आपण च खरे अधिपति आहोंत आणि आपल्या हातीं सत्ता आहे, याचें मात्र तुम्हांला भान नाहीं. ही एवढी निवडणूक झाली, पण जणूं एक नाटक झालें. समजा, एखाद्या घरांत चार पांच वर्षांचीं अजाण व मूर्ख मुलें आहेत. त्यांना जर विचारलें कीं "मुलांनो, घरचा कारभार आपण कसा चालवावा यावर मत द्या." तर ते म्हणतील तुम्ही विचारण्याचें हें काय नाटक चालविलें आहे ? आमचें मत कसलें विचारतां ? आम्ही काय मत देणार ? तुम्ही च आमचे मायबाप आहांत. आमची चिंता तुम्हीं च करायला पाहिजे," या प्रमाणें च लोकांनीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना सांगितलें कीं "तुम्ही थोर आहां, तुम्हीं आमची सेवा केली आहे, तुम्ही आमचे मायबाप आहां, तुम्ही च राज्य चालवा." परंतु मतें मागणारे म्हणतात, "आम्ही तुमचे नोकर होऊं इच्छितो, तुम्ही आम्हांला नोकरीवर ठेवूं इच्छीत असाल तर आम्ही तुमची चाकरी करूं." पण हे मते देणारे म्हणतात, "तुम्ही च आमचे मायबाप आहां, तुम्ही च आमची काळजी घ्या."

सत्ता कुणी दिल्यानें मिळत नसते. सत्ता किंवा अधिकार आंतून प्राप्त व्हावा लागतो. तसें पाहिलें तर हिंदुस्थानचे लोक अजाण नाहींत. फार विचारी आहेत. नुकती च जी निवडणूक झाली, ती किती उत्तम प्रकारें झाली ! एवढया मोठया निवडणुकींत काय होईल, किती भांडणें

होतील, असें लोकांना वाटत होतें. पण तसें कांहीं हि झालें नाहीं. हिंदुस्थानांतील लोक अशिक्षित असून हि येथील निवडणुका इतक्या चांगल्या प्रकारें कशा होऊं शकल्या याचें बाहेरच्या देशांतील लोकांना आश्चर्य वाटलें. पण यांत नवल कांहीं च नाहीं. हिंदुस्थानांतील लोक दहा हजार वर्षांचे अनुभवी लोक आहेत. ते अशिक्षित असले तरी अनुभवी आहेत. येथील निवडणुका उत्तम रीतीनें पार पडण्याचें कारण हें असें आहे.

हिंदुस्थानांतील लोक विचारी आहेत खरे, पण त्यांना गुलामगिरीची सवय जडली आहे. सरकार आईबापासारखी आपली काळजी घेईल, असें त्यांना वाटतें. आज त्यांच्या हातांत सत्ता आली असली तरी त्या सत्तेचें भान आणि प्रतीति त्यांना आली पाहिजे. आईचा अधिकार आईला कोणी देत असतो काय ? सिंहाला कुणी अरण्याचा राजा केलें आहे काय? त्याला आपल्या अधिकाराचें भान असतें. त्याप्रमाणें स्वराज्याच्या शक्तीचें जनतेला आंतून भान असायला पाहिजे.

तें कसें होईल ? गांवोगांवचे लोक दिल्लीचें राज्य चालविणार आहेत काय ? नाहीं. गांवोगांवचे लोक आपापल्या गांवचें चराज्य चालवितील. व त्यामुळें त्यांना राज्य च ालविण्याचा अनुभव येईल.

## सेवेची सत्ता

आजच्या काळांत राज्य हें प्राज्य असतें. कारण तें प्रजेचें, लोकांचें,असतें. पूर्वीच्या काळीं जो लोकांना कह्यांत ठेवी, दडपशाही करी, तो च राजा होई. अरण्याचा राजा सिंह असतो, असें म्हटलें जातें. जंगलांतील प्राण्यांना जो खातो, तो त्यांचा राजा, असा याचा अर्थ

झाला. जनावरांचा राजा जो सिंह, त्याला संस्कृतांत "मृगराज" म्हणतात. त्या राजाचें दर्शन झाल्याबरोबर सारे मृग थरथर कांपतात. या प्रकारची राज्यसत्ता आतां चालावयाची नाहीं. आतां राज्यसत्ता ही सेवेची सत्ता असेल. आईला घरांत काय अधिकार असतो? तिला कोणते हक्क असतात? मुलाला भूक लागली कीं त्याला दूध पाजणें, हा आईचा पहिला हक्क. मुलाला झोपवून नंतर झोपणें, हा हक्क नंबर दोन. मुलगा आजारी पडला तर रात्रीं जागणें हा हक्क नंबर तीन, आणि घरांत खाण्याच्या वस्तु कमी असल्या तर पहिल्यांदा मुलाला खाऊं घालून थोडेसें उरलें तर तें खाणें अथवा न उरलें तर उपाशी राहणें हा हक्क नंबर चार. मातेचे हक्क असे असतात. आज आमचें मातृराज्य आहे ना? मग त्याचे नमुने गांवोगांव दाखवावयाला पाहिजेत.

गांवोगांव जे बुद्धिमान, संपत्तिमान, आणि विचारवान, लोक असतील त्यांनीं गांवचे माय-बाप व्हावें, आणि गांवची सेवा करून गांवचें राज्य चालवावें. आमच्यापेक्षां आमचीं मुलें अधिक बुद्धिमान व्हावीं, अशी च बुद्धिमान वडिलाची इच्छा असते. मुलगा जेव्हां बापाहून अधिक श्रेष्ठ ठरतो, किंवा शिष्य जेव्हां जगांत इतकी कीर्ति मिळवितो कीं लोक गुरूचें नांव हि विसरतात, तेव्हां त्या बापाला आणि त्या गुरूला अत्यानंद होतो. आपलें नांव लोक विसरले आणि आपल्या शिष्याच्या नांवाची मात्र ते वाहवा करूं लागले हें पाहून तो खूष होतो. मीं शिष्याला ज्ञान दिल्यानंतर हि माझें नांव जगांत शिल्लक राहिलें तर मग मीं शिष्याला ज्ञान च काय दिलें? असें गुरूला वाटत असते. माझें नांव नाहींसे व्हावें आणि शिष्याचें नांव चालावें असें वाटल्यास च मी

खरा गुरु, असा विचार तो सतत करीत असतो. तसें गांवांतील शाहणे लोक जेव्हां इतर लोक आपल्यापेक्षां जास्त शाहणे व्हावे अशा दृष्टीनें काम करतील, तेव्हां च तें ग्रामराज्य म्हणजे च रामराज्य होईल.

## आपलें गांव म्हणजे एक राज्य

स्वराज्य म्हणजे सर्व लोकांचें राज्य. परक्या देशाची सत्ता आपल्या देशावर असत नाहीं, तेव्हां त्याला स्वराज्य म्हणतात. जेव्हां प्रत्येक गांवांत स्वराज्य होतें, तेव्हां त्याला रामराज्य म्हणतात. गांवांत सर्व लोक शाहणे, विचारी, झाले आहेत; कुणावर सत्ता चालविण्याची आवश्यकता पडत नाहीं, तेव्हां त्याला 'रामराज्य' म्हणतात. गांवांतील भांडणें शहरांतील कोर्टांत जातात आणि शहरांतील लोक त्याचा निवाडा करतात तेव्हां त्याला गुलामगिरी, दास्य, पारतंत्र्य, असें म्हणतात. गांवांतील भांडणें गांवात च मिटविण्याचें नांव आहे स्वातंत्र्य, स्वराज्य; आणि गांवांत भांडणें च होत नाहींत, अशी स्थिति झाली तर त्याला म्हणावें 'रामराज्य'. आपण आधीं ग्रामराज्य करूं या आणि मग रामराज्य करूं या. देशांत स्वराज्य झालें आहे. म्हणून आतां आपण ग्रामराज्य करूं या.

म्हणून, मित्रांनो, तुमच्या गांवाचें भलें कशांत आहे याचा विचार तुम्ही स्वतः करा. आपल्या गांवाला राष्ट्र समजा. आज तुम्ही जसें 'भारत माता की जय' म्हणतां, तसा आपल्या गांवाचा जयजयकार करा; हें आम्ही गांवोगांवीं जाऊन लोकांना समजावून सांगत असतों. प्रत्येक गांवाचा जयजयकार कसा होईल? आपला प्रत्येक अवयव काम करील तर सर्व शरीर काम करील. एखाद्या माणसाचें सर्व शरीर

चांगलें काम करीत असलें पण डोळा काम करीत नसला तर त्या माणसाला आंधळा म्हणतात. सारें शरीर काम करतें, पण कान नीट काम करीत नाहीं, तेव्हां त्याला बहिरा म्हणतात. तसें सर्व गांवें आपलीं कामें चांगल्या प्रकारें करीत असतील तर आपलें स्वराज्य चांगलें ठरेल. प्रत्येक गांवांत आम्ही राज्य चालविलें पाहिजे. देशांत राज्याचीं जितकीं खातीं असतात, जितकीं कामें असतात, तितकीं सर्व गावांत असली पाहिजेत. तेथें आरोग्य-खातें असतें. गांवांत हि आरोग्य-खातें असावयाला हवें. तेथें उद्योग-खातें, शेतकी खातें, शिक्षण खातें, न्याय खातें असतें. तशीं गांवांत हीं सारीं खाती असलीं पाहिजेत. तेथें परराष्ट्रांशी संबंध येतो तसा गांवाचा परगांवाशीं संबंध येतो.

## गांवोगांव विश्व-विद्यालय

प्रत्येक खेड्यांत विद्यापीठ असायला हवें. ‘ग्रामे ग्रामे विश्व-विद्यापीठम्’ हें आहे खरें ग्रामराज्य. कुणी मला म्हणाले “खेड्यांत प्राथमिक शाळा असाव्यात. मोठ्या गांवांत हायस्कुलें असावींत आणि (विशाखापट्टणसारख्या) मोठ्या शहरांत कॉलेजें असावीं.” मीं म्हटलें “ईश्वराची योजना अशी असती तर खेड्यांत दहा वर्षें वयापर्यंतचे लोक राहत असते, पंधरा वीस वर्षांपर्यंतचे लोक मोठ्या गांवांत राहते आणि त्याहून अधिक वयाचे लोक विशाखापट्टणसारख्या शहरांत राहते. पण जन्मापासून मरेपर्यंतचा लोकांचा सर्व व्यवहार जर गांवांत च चालतो; तर पुरें शिक्षण, पूर्ण विद्या, गांवांत कां चालू नये? एका एका प्रांतांत एक एक युनिवर्सिटी स्थापन करण्याची योजना हे लोक करीत आहेत. किती दरिद्री आहेत हे लोक !

माझ्या योजनेप्रमाणें प्रत्येक गावांत एक युनिवर्सिटी असेल. जरा विचार करा. तुम्ही गांवांत एक तुकडा ठेवणार काय? फक्त चार वर्षांची प्राथमिक शाळा म्हणजे एक तुकडा आहे. तेवढा च तुम्ही गांवांत ठेवाल तर गांवकऱ्यांना पुढील शिक्षण घ्यायचें असेल तेव्हां गांव सोडून शहरांत जावें लागेल. याला कांहीं अर्थ आहे काय? माझ्या खेड्यांत च मला पूर्ण शिक्षण मिळालें पाहिजे. माझें हें गांव तुकडा नाहीं. तें पूर्ण आहे. "पूर्णमदः पूर्णमिदं" तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहे. परंतु हे लोक म्हणतात तो हि तुकडा आहे व हा हि तुकडा आहे, आणि सर्व मिळून पूर्ण होतें. परंतु अशा प्रकारें तुकडे तुकडे जोडून पूर्ण बनविण्याची गोष्ट आमच्या योजनेंत नाहीं. प्रत्येक गांवांत राज्याच्या सर्व खात्यानिशीं एक परिपूर्ण राज्य तयार व्हावें, असें आम्ही इच्छीत आहों.

प्रत्येक लहान लहान गांवीं राज्य असेल तर त्या गांवांत राज्य-कार्य-धुरंधरांचा समूह असेल. गांवोगांव अनुभवी लोक असतील. दिल्लीवाल्यांना राज्य चालवितांना कधीं कांही अडचण उपस्थित झाली तर चार दोन खेड्यांत जाऊन तेथें ते लोक राज्य कसें चालवितात, हें पाहण्याचा ते विचार करतील. कारण प्रत्येक गांवांतून राज्य-शास्त्र-प्रवीण लोक राहत आहेत, हें त्यांच्या लक्षांत येईल. यासाठीं खेड्याखेड्यांतून विद्यापीठें हवींत. आज खेडे-गांवांत कुणी हि राज्यशास्त्रज्ञ नाहीं, जिल्ह्यांत हि नाहीं; इतकें च काय साऱ्या (आंध्र) प्रदेशांत दोन तीन राज्यशास्त्रज्ञ असतील, असें म्हटलें जातें. स्वराज्य चालवावयाचें आहे ना? मग इतके कमी राज्य-शास्त्रज्ञ राहून कसें चालेल? म्हणून गांवोगांव असे ज्ञाते असले पाहिजेत.

'मला मुख्यप्रधानाच्या पदांतून जरा मोकळें करा' असें एकदां पंडित नेहरू म्हणाले मात्र. सर्व लोक घाबरले. 'आपणांशिवाय आमचें

कसें चालेल?' असें ते म्हणूं लागले. हें स्वराज्य नव्हे. पंडित नेहरूंनीं मोकळे होण्याची इच्छा व्यक्त केली तर लोकांनीं त्यांना म्हणायला पाहिजे 'बरोबर आहे, आपण अवश्य मुक्त व्हावें. आपण आजवर खूप सेवा केली आहे आतां मुक्त होण्याचा आपणांस हक्क आहे." लोक असें म्हणतील तेव्हां च तें खरें स्वराज्य आहे, असें म्हणता येईल.

## सत्तेचें विकेंद्रीकरण

जी राज्यसत्ता दिल्लींत एका जागीं गोळा झाली आहे, तिला गांवोगांव वांटावयाचे आहे. परमेश्वराचे आपण भक्त आहोंत. म्हणून त्याचें च उदाहरण समोर ठेवूं या. देवानें जर सर्व अक्कल वैकुंठांत ठेवली असती आणि कुणा हि प्राण्याला अक्कल दिली नसती, तर हें जग कसें चालतें? मग जेव्हां कुणा मनुष्याला अकलेची जरूर पडती तेव्हां त्याला वैकुंठाला तार पाठवून थोडीशी अक्कल मागवून घ्यावी लागती. आणि मग त्याच्या मंत्र्यांना विमानांतून धावावें लागतें, अशी त्या परमेश्वराला किती तरी धावपळ करावी लागली असती. पण परमेश्वरानें सर्वांना अक्कल वाटून देण्याची किती सुंदर योजना केली आहे! माणसाला बुद्धि दिली आहे, घोड्याला, गाढवाला, सांपाला, विंचवाला, किड्याला सर्वांना बुद्धि दिली आहे. एकाच जागीं अकलेचें कोठार ठेवलें नाहीं म्हणून च भगवान निश्चिंतपणें क्षीर-सागरांत निद्रा घेत आहेत. आमचे मंत्री अशी झोप घेऊं शकतात काय? जगांत देवाची व्यवस्था इतकी चोख आहे कीं जगांत देव आहे कीं नाहीं अशी च शंका कित्येकांना येते. कारण तो आपली सत्ता चालवीत नाहीं. परंतु त्याला कोणी मानो अगर न मानो तो

निश्चिंत होऊन निद्रा घेतो, इतका तो क्षमाशील आहे. असे जेव्हां दिल्लीचे राज्यकर्ते झोपूं शकतील तेव्हां खरें स्वराज्य होईल. दिल्लींत क्षीर-सागर आहे आणि त्यांत आमचे मुख्य प्रधान झोपत आहेत, असें जेव्हां होईल, तेव्हां खरें स्वराज्य आलें असें आम्ही समजूं. आज आमचे मुख्य-प्रधान अठरा अठरा घंटे जागतात. हें स्वराज्य आहे काय ?

पूर्वीं सत्ता लंडनमध्यें होती. तेथून पार्सल होऊन ती आतां दिल्लीला आली आहे. ही मोठी च कृपा झाली आहे. पण तें पार्सल दिल्लीला अडकून पडलें आहे. तें आतां गांवोगांव पोहोचवावयाचें आहे. लोकांना स्वराज्याचें शिक्षण द्यावयाचें आहे, हें सर्व काम आपल्याला करावयाचें आहे. याला म्हणतात **'शासन-विभाजन.'** आज शासनाचे म्हणजे सत्तेचें केंद्रीकरण झालें आहे. त्या ऐवजीं सत्तेचें विकेंद्रीकरण केलें पाहिजे. प्रत्येक गांवांत सत्ता वाटली पाहिजे. मग जेव्हां गांवो-गांवचें लोक राज्यशास्त्रांत प्रवीण होतील आणि भांडणें करणार च नाहींत, तेव्हां शासन-मुक्ति होईल. रामराज्य होईल.

हें सर्व करावयाचें आहे. यासाठीं च भूदान-यज्ञ सुरू झाला आहे. आपल्या गांवची स्थिति सुधारण्यासाठीं तुम्हांला कंबर कसून तयार झालें पाहिजे, असें आम्ही गांवांतील जनतेला सांगत असतों. तुमच्या गांवांत भूमिहीन असतील तर त्यांना जमीन दिली गेली पाहिजे. जमीन कोठून द्याल ? दुसऱ्या गांवाहून जमीन आणाल ? आपल्या च गांवांतील जमीनीचा एक भाग त्यांना द्यावयाला पाहिजे. नंतर गांवो-गांव धंदे उभे केले पाहिजेत. 'आम्ही बाहेरचें कापड विकत घेणार नाहीं. आपल्या गांवांत कापड तयार करून तेंच वापरूं,' असा निश्चय

आपण केला पाहिजे. जे लोक बाहेरचें कापड वापरतात, ते नागवे आहेत, असें मला वाटतें. आतां माझ्यासमोर जे लोक बसले आहेत, त्या सर्वांनीं बाहेरचें कापड वापरलेले आहे; अर्थात् ही नागव्यांची सभा आहे. जर या लोकांना बाहेरून कापड मिळालें नाहीं, तर हे फाटके कपडे घालतील, नंतर लंगोटी वापरतील, आणि शेवटीं नागवे राहतील. कां ? तर कापड तयार करण्याची कला येत नाहीं म्हणून !

" तुम्हांला काम कां करावें लागतें ? सरकार जमीन कां वाटीत नाही ?" असें कांहीं लोक आम्हांला विचारतात. सरकारनें जर जमीन वाटली तर त्यानें ग्रामराज्य व्हावयाचें नाहीं, दिल्ली-राज्य होईल. लंडन-राज्या ऐवजीं आतां दिल्ली-राज्य आलें आहे. दिल्ली-राज्याऐवजीं गांवचें राज्य यावें अशी आमची इच्छा आहे. आमची भूक शमविण्या-साठीं जसें आम्हीं च खाल्लें पाहिजे, दुसऱ्यानें खाऊन भागत नाहीं, तसें आमच्या रामराज्यासाठीं आम्हांला च भूमिदान करावें लागेल, दुसरे कोणी करूं शकणार नाहींत. या खेरीज आपल्या राज्यांत कोणता माल बाहेरून यावा आणि कोणता माल आपल्या देशांतून बाहेर जावा, याचा विचार आज जसे दिल्लीचे राज्यकर्ते दिल्लीला बसून करीत असतात, तसें गांवोगांवच्या लोकांनीं आपल्या गांवांत बाहेरून कोणता माल यावा आणि आपल्या गांवातून कोणता माल बाहेर जावा, याचा विचार केला पाहिजे. आज प्रत्येक जण त्याच्या मर्जीला येईल तो माल बाहेरून विकत घेतो. पण यानंतर असें चालावयाचें नाहीं. सर्व गांवकरी मिळून चर्चा करतील. आणि योग्य तो निर्णय घेतील. गांवाला गुळाची जरूर असली आणि यावर्षीं आपल्या गांवीं गूळ तयार होऊं शकत नाहीं असें असलें तर या एका वर्षासाठीं गूळ बाहेरून विकत घेऊं या, असा ते निर्णय घेतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रमांक २८१३६ ...... विः ...
क्रमांक ... नोंदणी ...

पण गांवचे लोक स्वतः बाजारांत जाऊन गूळ विकत घेणार नाहींत. गांवच्या दुकानांतून विकत घेतील. अशा प्रकारें गांवचें लोक बाहेरचा गूळ गांवांतील दुकानांतून वर्षभर विकत घेतील आणि नंतर गांवांत ऊस पेरून पुढील वर्षासाठीं गूळ आपल्या गांवीं तयार करतील. गांवच्या दुकानांत तो गूळ ठेवला जाईल आणि लोक तो च गूळ घेतील.

अशा रीतीनें सर्व गांव एका मनानें विचार करील. गांवांत पांचशें लोक असले तर गांवांत एक हजार हात असतील, एक हजार पाय असतील, पांचशें डोकीं असतील; पण हृदय, मन, एक असेल. गीतेंत अकराव्या अध्यायांत विश्वरूप-दर्शनाचा प्रसंग आलेला आहे. विश्वरूप दर्शनांत हजारो हात, हजारो पाय, कान, डोळे आहेत. पण हृदयें हजारो आहेत, असें म्हटलेलें त्यांत तुम्हांला आढळावयाचें नाहीं. विश्व-रूपाचें हृदय एक च असणार. तसें गांवचें हृदय एक असेल. पांचशे डोकीं चर्चा करतील. व चर्चा करून निर्णय घेतील. अशी आमच्या सर्वोदयाची योजना आहे.

## सर्वोदय कोण करील ?

हें सर्वोदयाचें काम तुम्ही कराल कीं तुमचे राजधानींत बसलेले दिल्लीवाले राज्यकर्ते करतील, हें सांगा. तुम्ही तुमची योजना तयार केली तर दिल्लीवाले तुम्हांला कांहीं मदत देतील, हें ठीक आहे. पण तुमच्या गांवासाठीं तुम्हांला च योजना केली पाहिजे. तुम्ही गांवोगांव जाऊन विनोबाची ही गोष्ट समजावून द्याल तर बुद्धिमान शेतकऱ्यांना ती समजण्याची अक्कल आहे. तुम्हांला मग एक एकर, दोन एकर, असे दान मिळायचें नाहीं. गांवोगावचे लोक तुमच्याकडे येतील आणि

"आम्हीं आमच्या गांवांतील भूमिहीनांचा प्रश्न सोडविला आहे, आमच्या गांवांतील भूमिहीनांना आणि कमी जमीन असणाऱ्यांना पुरेशी जमीन आम्हीं दिली आहे," असें ते तुम्हांला सांगतील. आणि सर्व दात्यांनीं सह्या केलेलीं दानपत्रें तुमच्या कार्यालयांत पोंहचतीं करतील. इतकें त्यांनीं केलें म्हणजे मग त्यांना गांवांतील सारी जमीन गांवाची करायला सांगा. 'आज तुमच्या गांवांत कोणी हि भूमिहीन राहिला नांहीं, आतां कोणी हि जमीन-मालक राहतां कामा नये,' असें सांगा. हें काम एकदम व्हावयाचें नाहीं, हें आम्हांला माहीत आहे, म्हणून 'सध्यां खादी आणि ग्रामोद्योगाचें काम तुमच्या गांवांत सुरू करा,' असें त्यांना सुचवा.

## पांच लाख गांवांत स्वराज्य

हें सर्व करण्याला वेळ लागेल हें आम्ही जाणतों. पण वेळ थोडा लागेल, फार लागावयाचा नाहीं. एका गावास एक वर्ष लागलें तर पांच लक्ष गावांना किती वेळ लागेल ? असें त्रैराशिक मांडून हा विचार करावयाचा नसतो. तुमच्या गांवीं आंबे पिकूं लागले कीं हिंदुस्थानच्या पांच लक्ष गांवीं आंबे पिकावयाला लागतात. म्हणून तुमच्या गांवीं ग्राम-राज्य होण्याला जेवढा वेळ लागेल तितक्या वेळांत सर्व हिंदुस्थानच्या पांच लक्ष खेड्यांत रामराज्य स्थापन होईल. हा विचार तुम्ही गांवोगांव जाऊन समजाविला तर आजच्यासारखी लाख दोन लाख एकर जमीन मिळविण्याची दरिद्री कल्पना तुम्ही करणार नाहीं. तुम्ही मग कोटी कोटी एकरांची भाषा बोलूं लागाल.

## तीन सूत्रें

आज मीं तुमच्यासमोर सूत्ररूपांत विचार मांडला आहे. पहिला

विचार केंद्रीय स्वराज्य; दुसरा विचार विभाजित स्वराज्य; आणि तिसरा विचार राज्य-मुक्ति अथवा रामराज्य. त्याला रामराज्य म्हणायचें कीं अराज्य म्हणायचें, ही प्रत्येकाच्या इच्छेची गोष्ट आहे. ईश्वर नाहीं, असें हि तुम्ही म्हणू शकतां आणि ईश्वर क्षीरसागरांत झोपलेला आहे, असें हि म्हणू शकतां. पण ईश्वर घामोघाम होऊन काम करीत आहे हें तुम्ही म्हणू शकत नाहीं. ईश्वर नाहीं अथवा तो अकर्ता झाला आहे, असें बोलू शकतां. ईश्वर कर्म करीत आहे आणि सर्वांवर आपली सत्ता चालवीत आहे, असें तुम्हांला म्हणतां येणार नाही. हें तत्त्वज्ञान, ही ब्रह्मविद्या, या देशांत आपल्याला आणावयाची आहे.

## परस्परावलंबन

तुम्ही सर्वांनीं भावाभावासारखें उत्साहानें कामाला लागावें, अशी माझी इच्छा आहे. "विनोबाची योजना परस्परावलंबनाची नाहीं; स्वावलंबनाची आहे," असें कांहीं लोक म्हणतात. विनोबाची योजना परावलंबनाची नाहीं, इतकें मात्र ते मान्य करतात. पण परस्परावलंबन असलें पाहिजे, असें त्यांचे म्हणणें आहे. परस्परावलंबन आम्हांला हि हवें आहे. आज विनोबा गाईचें दूध प्याला, हें दूध काय त्यानें काढलें होतें? विनोबासाठीं लोकांनीं ही सारी व्यवस्था केली होती. विनोबा-कडून होते ती सेवा विनोबा करतो व लोकांनीं करावयाची ती व्यवस्था लोक करतात. असें हें परस्परावलंबन च आहे. पण परस्परावलंबन दोन प्रकारचें असतें. आंधळ्याचें आणि लंगड्याचें हि एक परस्परावलंबन असतें. आंधळा पाहू शकत नाहीं, पण चालू शकतो. लंगडा चालू शकत नाहीं, पण पाहूं शकतो, म्हणून दोघे परस्परावलंबन अथवा सहकार कर-

तात. लंगडा आंधळ्याच्या खांद्यावर बसतो. तो पाहण्याचें काम करतो आणि आंधळा चालण्याचें काम करतो. अशा प्रकारें समाजांतील कांहीं लोकांना आधळे आणि कांहीं लोकांना लंगडे ठेवून, त्या दोघांचें परस्परावलंबन हे लोक साधूं पाहत आहेत काय ? विनोबाला हि परस्परावलंबन हवें आहे. पण दोघांना डोळे असावेत, दोघांना हि पाय असावेत आणि मग त्या दोघांनीं हातांत हात घालून एकमेकांबरोबर चालावें, अशी त्याची इच्छा आहे. विनोबाला समर्थांचें परस्परावलंबन हवें आहे. आणि हे लोक, व्यंगयुक्त अथवा अक्षम लोकांचें परस्परावलंबन इच्छीत आहेत.

सर्व च वस्तु एका गांवांत तयार होऊं शकत नाहींत, हें मला माहीत आहे. एका गांवानें दुसऱ्या गांवांशीं, आणि गांवांनीं शहरांशी, सहकार करावयाचा असतो. परंतु गांवामध्यें शहरांतून पीठ दळून यावें, तांदूळ कुटून यावा आणि साखर तयार करून आणली जावी, हें आम्ही इच्छीत नाहीं. गांवांत च या वस्तु तयार व्हाव्यात, असें आम्ही इच्छितों. गांवांत थर्मामीटर, लाऊडस्पीकर, यांसारख्या वस्तूंची आवश्यकता पडली तर त्या वस्तु शहरांतून आणाव्या. आज शहरांतील लोक गांवांतील लोकांचे उद्योगधंदे स्वतः च करतात. गांवांत कच्चा माल असतो त्याचा पक्का माल गांवांत च तयार होऊं शकतो. असें असून हि आज शहरांत यंत्रांच्या साहाय्यानें त्याचा पक्का माल तयार करतात. तिकडून परदेशांतून जो माल शहरांत येतो, त्याला हे शहरवाले थोपवीत नाहींत. खेडयाचे उद्योगधंदे खेडयांत चालावे आणि परदेशांतून जो माल येथें येतो, त्याला थोपविण्यासाठीं तो माल शहरांत तयार व्हावा, अशी आमची इच्छा आहे. गांवांतील उद्योगधंदे जर नष्ट झाले तर फक्त खेडयांवर च संकट येईल असें नसून शहरांवर हि

येईल. गांवांतील बेकारांचा शहरावर हल्ला होईल आणि तिकडून परदेशी मालाचा हल्ला हि होत च राहील. अशा प्रकारें दोहोंच्या हल्लयांत शहरांतील लोक भरडले जातील. म्हणून खेडयांतील लोक आपले धंदे खेडयांत चालवितील आणि शहरांतील लोक परदेशांतून येणारा माल शहरांत तयार करतील, अशा प्रकारचा खेडया-शहरांतील सहकार आमच्या योजनेंत आहे. यामुळें प्रत्येक गांव पूर्ण होईल आणि पूर्णांचा सहकार होईल.

## खादी-कार्याचा पाया

हिंदुस्थानांत कित्येक वर्षांपासून खादीचें काम चाललें आहे. छत्तीस वर्षे चाललेल्या या कामाशीं अगदी सुरवातीपासून आजपर्यंत माझा पूर्ण परिचय आहे. कांतण्यांत विणण्यांत व या कामाच्या प्रत्येक प्रक्रियेंत व प्रयोगांत माझ्या आयुष्याचीं कित्येक वर्षे मीं घालविली आहेत. हीं कामें मी, माझ्या विद्यार्थीनीं आणि माझ्या सहकाऱ्यांनीं केलीं आहेत. बाहेरून कापड येऊं नये आणि गांवाला लागणारें सारें कापड गांवांत च व्हावें, असा आम्ही सतत प्रयत्न केला आहे. हा प्रयोग प्रत्येक प्रांतांतील प्रत्येक गांवांत झाला आहे. एका मर्यादेपर्यंत हें काम चाललें आणि मग थांबलें. कारण त्या कामासाठीं जो पाया पाहिजे होता तो घातला गेला नव्हता. जसें घरोघर धान्य उत्पन्न होतें, तसें च घरोघर कापड तयार करण्याला देशांतील लोक तयार होतील तेव्हां खादीच्या कामाचा नीट पाया घातला जाईल.

## घरोघर खादी

या गांवांत थोडीशी कुटुंबें सोडल्यास बाकी सारी कुटुंबें खादी-

धारी आहेत, असें तुम्ही म्हणालांत. आम्हांला जो पुढील समाज तयार करावयाचा आहे, त्यांत एक गांव एक कुटुंब होईल. आतापर्यंत हें काम आम्ही करूं शकलों नव्हतों. प्रत्येक कामाची एक वेळ असते. ईश्वराची एक योजना हि असते. आमच्या प्रयत्नांत आम्हीं मात्र कधीं कसूर केली नाहीं. आजवर सतत प्रयत्न करीत राहिलों. गांवोगांव आणि घरोघर जशी शेती होते, त्याचप्रमाणें खादी गांवोगांव आणि घरोघर कशी होईल, हा विचार गेल्या चार वर्षांपासून मात्र आम्ही नित्य करीत आहों. भांडारांत मिळणाऱ्या खादीबाबतचा हा आमचा विचार नाहीं. शेतांत काम करून उरलेल्या वेळांत आपल्या गांवांत आणि आपल्या घरांत तयार होणाऱ्या खादीविषयींचा हा विचार आहे. खेड्यांत स्वराज्य होईल, तेव्हां हें होऊं शकेल.

सरकार जर गिरण्यांवर नियंत्रण ठेवील आणि लोकांना उत्तेजन देईल तर हें काम होईल. सरकारला पूर्वीं हें धैर्य नव्हतें. यासाठीं "लोक राजी नाहींत, अशा स्थितींत हें कसें होऊं शकेल?" असें सरकार म्हणत असे. ज्यांची खादीवर निष्ठा नाहीं असे सरकारांततील लोक अशा प्रकारचा युक्तिवाद करीत असत. पण स्वराज्याच्या इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर हि बेकारी वाढत च चालली आहे असें दिसून आलें म्हणून खादीला उत्तेजन द्यावें असें आतां सरकारला वाटलें. सरकारनें या बाबतींत पाऊल उचललें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. लोक ज्याप्रमाणें आपापल्या घरीं भाकर तयार करतात, त्याप्रमाणें त्यांनीं आपापल्या घरीं खादी तयार करावी, व या कामाला आपल्या जीवनाचें अंग बनवावें. ही फार महत्त्वाची बाब आहे. फक्त सरकारच्या प्रयत्नांनीं ही गोष्ट होऊं शकत नाहीं. प्रत्येक मुलाचें लालनपालन

चांगलें व्हायला पाहिजे असें सरकारला वाटतें. पण आईबापांमार्फत च हें काम व्हायचें. सरकार तें करूं शकणार नाहीं. जीवनांत एखादी वस्तु दाखल करायची असेल तर त्याविषयीं निश्चय करणें, संकल्प करणें, हें लोकांचें च काम आहे. सरकार त्या संकल्पांत कांहीं मदत करूं शकतें. तशी तें मदत करतें हि. पण सरकारनें साह्य केलें नाहीं, व विरोध केला, असें समजा. तरी हि लोक जो संकल्प करतील त्याची पूर्ति ते जनशक्तीच्या द्वारें करतील.

लोकशक्तीखेरीज सरकारजवळ कसली हि स्वतंत्र शक्ति नाहीं; असें आम्ही पूर्वीपासून आतांपर्यंत मानीत आलों आहोंत. जनता मालक आहे, सरकार नोकर आहे. मालकापेक्षां अधिक शक्ति नोकराला कशी असेल ? "सरकारची शक्ति फार मोठी आहे, सरकार च क्रांति-कारी बदल घडवूं शकतें," असें ज्या लोकांना वाटतें, ते मालकापेक्षां नोकराची किंमत अधिक करतात, असा च त्याचा अर्थ आहे. पण वस्तुस्थिति अशी नाहीं. तुमच्यांत पुष्कळ शक्ति आहे. तुमच्या आत्म्यांत ती विराजमान आहे.

## जनसंख्येचें भूत

हिंदुस्थानची लोकसंख्या जास्त आहे आणि जमीन कमी आहे, ती वाढूं शकत नाहीं, ही गोष्ट लक्षांत घ्यावयाला हवी. म्हणून केवळ शेतीवर च खेड्यांतील लोकांचें भागावयाचें नाहीं, हें स्पष्ट आहे. दुसऱ्या धंद्यांखेरीज गांवाला आधार मिळावयाचा नाहीं. या कामीं यंत्रांची कांहीं च मदत व्हावयाची नाहीं. कारण विज्ञान वेगळें आणि यंत्र वेगळें. यंत्र-युगांत शेतीचें काम पूर्वीपेक्षां फार जलद होऊं शकते. परंतु

यंत्रांनीं शेतींत प्रवेश केला तर बेकारीचा प्रश्न वाढेल, कमी होणार नाहीं.

देवानें प्रत्येकाला एक तोंड दिलें आहे, त्या बरोबर च दोन हात हि दिले आहेत. तरी हि बेकारीचा प्रश्न उभा राहतो. मग त्यानें जर दोन तोंडें आणि एक हात दिला असता, तर काय अवस्था झाली असती कोण जाणे ! 'आमच्या घरांत पांच खाणारी तोंडें आहेत,' असें आम्ही नेहमी म्हणतों. पण पांच तोंडे आहेत तिथे दहा हात हि आहेत, ही गोष्ट आमच्या तर काय पण हिंदुस्थानांतील मोठमोठ्या माणसांच्या हि ध्यानांत येत नाहीं. हिंदुस्थानांत लोकसंख्या फार वाढू लागली आहे, ती कमी झाली नाहीं तर हिंदुस्थानची उन्नति होणार नाहीं, असें ते म्हणतात. या प्रकारचा हा विचार पाश्चात्यांनी फार मोठ्या प्रमाणावर प्रसृत केला आहे. इंग्लंडमध्यें त्या मानानें लोकसंख्या पुष्कळ आहे आणि हिंदुस्थानांत कमी आहे हें खरें असलें तरी हिंदुस्थान फार दरिद्री आहे व अशा दरिद्री देशांत लोकसंख्या वाढणें भयंकर आहे, असें ते लोक समजतात. अशा प्रकारें हिंदुस्थानच्या लोकसंख्येचें एक भूत त्यांनीं उभें केलें आहे.

नुकतीच घडलेली गोष्ट. आमच्या यात्रेंत आमच्या बरोबर एक अमेरिकन भगिनी होती. पांच सात दिवसांपूर्वीं ती गेली. कोण्या दुसऱ्या देशांत ती प्रोफेसर होती आणि तेथून अमेरिकेला परत जात होती. हिंदुस्थानांत हे लोक येतात आणि आले म्हणजे भूदानाचें काम हि पाहून जातात. जातिभेद, दारिद्र्य, लोकसंख्येची वाढ, हे हिंदुस्थानांतील भयानक प्रश्न आहेत, असे तिनें हि वाचले व ऐकलें होते. बाहेरून अशा स्त्रिया जेव्हां येतात तेव्हां स्वाभाविक च मुलें बाळें त्यांच्या

आवती भोंवतीं गोळा होतात. "आपणांबरोबर मी फिरत असतांना येथें मुलें फार आहेत, असें मला दिसून आलें" असें तिनें मला सांगितलें आणि हिंदुस्थानची लोकसंख्या अशी वाढत राहिली तर काय होईल ? असा तिनें मला प्रश्न विचारला. मला वाटलें, हा गैरसमज जर तिच्या मनांत कायम राहिला तर न जाणो अमेरिकेंत जाऊन ती काय सांगेल !

ज्या ज्या गांवीं आम्ही जातां, तेथील लेखी माहिती आमच्याजवळ असते. त्यांतील दहा पांच गांवांची माहिती तिच्या समोर मीं ठेवली. तिनें हिशोब केला तेव्हां दर घरीं एक मूल सुद्धां पडत नाहीं, असें तिला आढळून आलें. मुलें इतकीं कमी असतील तर कसें होईल, असा प्रश्न आतां तिच्यापुढें उभा राहिला. अभ्यास करण्यासारखी ही गोष्ट आहे. इकडे प्रत्येक घरीं एक पुरुष, सव्वा स्त्री आणि एक अथवा सव्वा मुलगा, असा लोकसंख्येचा हिशोब पडतो. म्हणजे एकूण दर घरीं साडे तीन माणसांचा हिशोब पडला. हिंदुस्थानांत सामान्यतः प्रत्येक घरीं पांच व्यक्तींचा हिशोब पडतो, या भागांत तो साडे तीन आहे. म्हणून संततीचा कांहीं प्रश्न च नाहीं. जेथें घरांत पांचांची लोकसंख्या आहे, तेथें हि संततीचा प्रश्न नाहीं. आणि जोंवर प्रत्येकाला एक तोंड आणि दोन हात आहेत, तोंवर जनसंख्येचा बाऊ वाटण्याचें कारण च नाहीं.

लोकसंख्या फार वाढत आहे, मोठी भयानक स्थिति आहे, अशी राष्ट्राच्या नेत्यांना काळजी वाटत आहे. सैन्यांत संख्या जास्त असली तर सेनापतीला आनंद होतो, दुःख होत नाहीं. पण हे करंटे दुःखी होतात, आणि आमच्या देशाची लोकसंख्या वाढू लागली आहे, असें

ओरडावयाला लागतात. भूमीला पापाचा भार होतो, धर्माच्या संततीचा होत नाहीं, असें मीं अनेक वेळां म्हटलें आहे, आणि आज हि तें च पुन्हां म्हणत आहें. संतति पापानें हि निर्माण होते आणि पुण्यानें हि निर्माण होते. संतति पापानें हि अटकवितां येते आणि पुण्यानें हि अटकवितां येते. कोणत्या हि पापकृत्याचा पृथ्वीला भार च होत असतो.

पृथ्वींत जें निर्माण होतें त्याच्या पोषणाची सोय तींत असते. जें कांहीं निर्माण होतें, त्याच्या बदल्यांत तिला परत मिळत राहिलें तर तिला कांहीं भार होत नाहीं. मलमूत्राचा योग्य उपयोग झाला पाहिजे. खताच्या रूपानें खाल्लेलें अन्न तिला परत मिळूं शकतें. जनावरांचीं हाडें इत्यादि शेतांना उत्तम स्थितींत मिळालीं पाहिजेत. जंगलांतील पालापाचोळा असा च व्यर्थ उडून जातो, त्याचा उपयोग झाला पाहिजे. आम्ही सर्व जर हातांनीं काम करूं आणि परत करण्याच्या सर्व वस्तु पृथ्वीला परत करूं तर पृथ्वी-मातेला मनुष्य-संख्येचा भार व्हावयाचा नाही. जोंपर्यंत तुम्ही आपल्या वस्तु स्वतः तयार करण्याचें व्रत घेणार नाहीं, तोंवर कोणतें हि सरकार तुमच्यासाठीं कसली हि योजना करूं शकणार नाहीं.

गांवकरी जेव्हां सीताराम सीताराम म्हणायला लागतील, तेव्हां च ते सुखी होतील. सीता आहे शेती. आणि राम आहे ग्रामोद्योग. शेती मिळून मिसळून सर्वांनीं करावी. शेती सर्वांपाशीं असेल. मुलें मातेची सेवक असतात, मालक असूं शकत नाहींत. तद्वत् आम्ही भूमातेचीं लेकरें आहोत, मालक नाहीं. "एकटी व्यक्ति मालक होऊं शकत नाहीं, पण सर्व मिळून समूह मालक होऊं शकतो," असें कांहीं जण म्हणतात. एकटा मुलगा आईचा

मालक होऊं शकत नाहीं, तशीं सर्व मुलें मिळून हि आईचे मालक होऊं शकत नाहींत, असें माझें म्हणणें आहे. जमिनीचा मालक परमेश्वर आहे आणि सेवेचा अधिकार च नव्हे तर कर्तव्य आम्हां सर्वांचें आहे.

"जमिनीचे तुकडे होतां कामा नयेत, ज्यांना पुरेशी जमीन देऊं शकतों, त्यांना जमीन द्यावी, आणि बाकीच्या लोकांना दुसरे धंदे द्यावेत," असें हे लोक आम्हांला सांगतात. ग्रामोद्योग राम आणि शेती सीता, असें मीं म्हटलें आहे. दोन्ही मिळून गांवाचें भलें होतें, ग्रामोद्योगांची गावाला अत्यंत आवश्यकता आहे. त्यांच्या शिवाय शेतीची पूर्ति होऊं शकत नाहीं, आणि ग्रामजीवन स्वावलंबी होऊं शकत नाहीं, ग्रामराज्याची स्थापना होऊं शकत नाहीं. राम अयोध्येंत राहतो आणि सीता मथुरेंत राहते, अशी वांटणी आम्ही करूं शकत नाहीं. दोघे बरोबर च राहतील. गांवांत कांहीं लोकांना भाकर, कांहींना पाणी आणि कांहींना दूध मिळेल, तसें च ज्याला पाणी मिळेल त्याला भाकर नाहीं, ज्याला भाकर मिळेल त्याला पाणी मिळणार नाहीं आणि ज्याला दोन्ही मिळतील त्याला दूध मिळावयाचें नाहीं, असें होऊं शकत नाहीं. पाणी, भाकर, दूध या तिन्ही वस्तु प्रत्येकाला मिळावयाला पाहिजेत, असें आमचें म्हणणें आहे. कुणाच्या हिश्शाला पाव एकर जमीन कां येईना पण जमिनीची मशागत करण्याची, व तिची सेवा करण्याची, आणि धर्मपालनाची संधि प्रत्येकाला मिळाली पाहिजे. कुणाला किती जमीन मिळेल, हा प्रश्न नाहीं. परंतु प्रत्येकाला जमीन मिळाली पाहिजे. आणि प्रत्येकानें तिची सेवा केली पाहिजे.

१२१२

## भूमिसेवेचा अधिकार

देशाच्या मुख्य प्रधानानें तीन किंवा चार घंटे शेतीचें काम करावें आणि उरलेल्या वेळांत आपल्या जबाबदारीचें दुसरें काम करावें, हा अंतिम आदर्श आहे. यामुळें देशाचें पावित्र्य वाढेल, आरोग्य वाढेल. उच्च नीच भावना नाहींशी होईल. जमिनीला अनेक सेवक मिळतील. सर्वांच्या बुद्धींचा तिला लाभ होईल. कांहीं लोकांना शेती करा, असें सांगणें आणि इतरांना तुम्ही दुसरें काम करा, असें सांगणें अन्याय आहे. अभ्यासासाठीं आम्ही आठ घंटे विणकाम, आठ घंटे कांतणें आणि आठ घंटे दुसरीं कामें केलीं आहेत. पण जर मला कुणी आज आठ घंटे विणावयास भाग पाडील तर मी ते अवश्य नाकारीन. जेथें हवा नाहीं, अशा बंद खोलींत बसावें, तेथें हाताला व्यायाम नसावा, आणि कंबर मात्र तुटावी, याला मी मुळीं च तयार नाहीं. चार तास मला आकाश-सेवन करण्याला वाव मिळाला पाहिजे. उत्तम हवा मिळाली पाहिजे. सूर्य-प्रकाश मिळाला पाहिजे आणि जमिनीची सेवा करण्याची संधि मिळाली पाहिजे. हा माझा हक्क आहे.

जमिनीचें उत्पन्न यामुळें घटेल, असें मला वाटत नाहीं. आणि घटत असलें तरी कांहीं लोकांना शेती करण्यास सांगून इतरांना तिच्या पासून वंचित ठेवावें, ही गोष्ट करायला मी तयार नाहीं. जसा भाषण-स्वातंत्र्याचा आणि विचार-स्वातंत्र्याचा हक्क मानला गेला आहे तसा अन्न खाण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. कांहीं जणांनीं तर मिठाचा हि हक्क मानला आहे. त्याच प्रमाणें शेतीचा उत्तम व्यायाम मिळावा आणि तिची सेवा करण्याची संधि मिळावी हा मनुष्यमात्राचा अधिकार आहे.

यांत कोणत्या हि आर्थिक योजनेला हस्तक्षेप करतां येणार नाहीं आणि तसल्या योजनेचा विचार करावयाला आम्ही तयार हि नाहीं. भूमिसेवा हा पारमार्थिक हक्क आहे. कांहीं जण चोवीस तास झोपले, आणि कांहीं जणांनीं चोवीस तास दुसरें काम केलें तर आर्थिक फायदा होईल, अशी योजना कोणीं मांडली, तर ती कोण मंजूर करील?

मी तर असें इच्छितों कीं, आम्ही रात्रीं रेल्वेचें काम करणार नाही, असें लोकांनीं म्हणावे. आगगाडया दिवसा चालाव्यात. कुणी आजारी पडला, कांहीं संकट आलें, अशा वेळीं आम्ही रात्रीं काम करूं तर ते योग्य आहे. पण केवळ नोकरीसाठीं रात्रीं काम करावें लागावें, याला सारा मानवसमाज नकार देऊं शकतो. आगगाडया जर दिवसा चालल्या तर त्यांची काय स्थिति होईल ? जेथें रात्र झाली तेथें त्या थांबतील. मोठी विचित्र गोष्ट मी तुमच्यासमोर मांडली आहे. परंतु जो आत्म्याच्या दृष्टीनें विचार करतो, त्याची विचार करण्याची पद्धति जगापेक्षां निराळी च असते. त्यामुळें आमचें हि एक अर्थशास्त्र आहे, आणि त्याचें एक वैशिष्ट्य हि आहे.

आमच्या ग्राम-रचनेंत प्रत्येक माणसाला शेती करण्याचा हक्क असेल. त्याला उरलेल्या वेळीं दुसरीं कामें करतां येतील. " तूं प्रोफेसर हो,सहा तासांच्या कामाला तुला पांच हजार रुपये पगार मिळेल, पण शेतीचें काम करायला मिळणार नाहीं, " असें मला कुणीं म्हटलें तर मी तयार होणार नाहीं. मला चार तास शेतींत काम करायला हवें आहे. आणि उरलेल्या वेळांत मी शिक्षकाचें काम करीन असें मी म्हणेन. त्यासाठीं मला पैसा नको शेतीचें काम करून जें मिळेल तितकें च मी घेईन. मला

तुमचा तो ढीगभर पैसा हि नको आणि ती शिक्षकाची हमाली हि नको. सर्व लोक जर शेतींत काम करतील तर ते उत्तम प्रोफेसर, उत्तम व्यापारी, उत्तम वकील, इत्यादि होतील असें माझें मत आहे. सर्वोदयाच्या या दृष्टीनें व विचारानें सर्व गांवें स्वावलंबी होतील इतकें च नव्हे तर त्यांचा पूर्ण विकास होईल. मानवतेचा पूर्ण विकास प्रत्येक खेडयांत होईल. आणि त्या खेड्यांचा एकमेकांशी सहकार असेल. आम्ही पूर्णांचा सहकार इच्छितो,अपूर्णांचा किंवा अक्षमांचा सहकार आम्ही इच्छित नाहीं. पूर्ण विकासाची संधि ग्रामोद्योग आणि शेती मिळून च प्राप्त होऊं शकते.

## सर्वांना शिक्षण

तिसरा मुद्दा शिक्षणाचा. केवळ ब्राह्मण च शिकेल आणि बाकी सर्व त्याच्या ज्ञानावर अवलंबून राहतील, असें व्हावयाचें नाहीं. ज्ञान-भोजनाची संधि, शेतींत काम करण्याची संधि, बुद्धि आणि हृदय यांचा विकास करण्याची संधि, या तीन वस्तु प्रत्येक घरीं आणि प्रत्येक कुटुंबांत सर्वांना मिळाल्या पाहिजेत. जेव्हां हें घडेल तेव्हां गांवोगांव आनंद होईल. तुलसीदासजींनीं म्हटल्याप्रमाणें ‘ गांव गांव अस होइ आनंदा ” गांवोगांव आनंदाचा सुकाळ होईल. मात्र तुम्ही हें सर्व चांगल्याप्रकारें समजाल आणि एक होऊन संकल्प कराल तेव्हां च होईल. म्हणून एक कुटुंब करा. जमीन सर्वांची करा. जितकीं मुलें आहेत तीं सर्व गांवाचीं आहेत, वेगवेगळ्या घरचीं नाहींत, असें माना, आणि आपल्याला सर्वांच्या शिक्षणाची चांगली योजना तयार करावयाची आहे, असें समजा आमच्या जरुरीच्या वस्तु

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रमांक २८९३८ वि: २५ निबंध
क्रमांक ७२६२ नों: दि: ७५



आम्ही च आमच्या हातांनीं तयार करूं, बाहेरून आणणार नाहीं, गांवांत च कच्च्या मालाचा पक्का माल तयार करूं, असा निश्चय करा.

### वस्त्रस्वावलंबनाचा संकल्प

आवश्यक वस्तूंमध्यें कापड हा मेरुमणी आहे. जगांत असें म्हटलें जाते कीं अन्नाची आवश्यकता पहिली आणि कापडाची दुसरी. परंतु मानवसंस्कृतीचा विकास अशा प्रकारें झाला आहे कीं कपड्याची गरज पहिली आणि अन्नाची दुसरी, असें म्हणण्याचा प्रसंग येतो. मी चार दिवस उपाशी राहूं शकतों, पण तुमच्यासमोर अर्धा तास सुद्धां नागवा राहूं शकत नाहीं. म्हणजे कापडाची आवश्यकता सांस्कृतिक आहे हें तुमच्या ध्यानांत येईल. उन्हापासून किंवा थंडीपासून रक्षण होण्यासाठीं कपड्याची भौतिक आवश्यकता असती तर तिचें द्वितीय स्थान असतें आणि अन्नाचें प्रथम स्थान असतें. मेल्यावर सुद्धां प्रेताला कापडाची आवश्कता असते. मेल्यावर खाण्याची कल्पना तुम्ही करूं शकतां कां ? म्हणून संस्कृतीच्या दृष्टीनें कापड पहिल्या श्रेणींत जाऊन बसलें आहे. अशा या कापडाविषयीं जो गांव परावलंबी असेल, तो स्वप्नांत हि सुखी व्हावयाचा नाहीं.

म्हणून जगभर गिरण्या चालत असोत, खेड्यांत मिलचें कापड स्वस्त मिळो, किंवा फुकट मिळो; वाटल्यास बाहेरचें कापड घेणाराला दोन आणे इनाम मिळोत, पण आम्ही आमच्या गांवाचें आमच्या हातांनीं केलेलें कापड च वापरूं, असा तुम्हीं संकल्प केला पाहिजे. स्वावलंबी

व्हाल तर च विकास होईल, म्हणून 'आम्ही या बाबतींत परावलंबी असणार नाहीं,' अशी परमेश्वरासमोर तुम्ही प्रतिज्ञा केली पाहिजे.

## गांवागावांत आणि घराघरांत स्वराज्य

जेथें सर्वोदयाचें काम अनेक गांवांतून चाललें आहे. तेथें हि आम्ही ही गोष्ट मांडू इच्छितों. गांवोगांव हें काम चालावें, अशी आमची इच्छा आहे. गांवांत लक्ष्मी वाढावी, गांव सुखी व्हावा, आणि त्याबरोबर च स्वावलंबी हि व्हावा, असें आम्हांला वाटतें. आमचा देश स्वतंत्र झाला आहे. असें आज बोललें जातें. एक भलें मोठें ओझें होतें, तें दूर झालें, फार मोठी गोष्ट झाली, यांत संशय नाहीं. पण एवढ्यानें च आम्ही स्वतंत्र झालों, असे मात्र नाहीं. स्वातंत्र्य आत्म्याचें असतें, मानसिक असतें. आज सुद्धां आम्ही प्रत्येक बाबतींत सरकारच्या तोंडाकडे पाहतों. जेव्हां पारतंत्र्यांत होतों तेव्हां आम्ही प्रिव्ही कौंसिलला जात होतों. आज दिल्लीला जातों. एवढा च फरक. जेव्हां पहिलें कोर्ट गांव आणि शेवटचें कोर्ट परमेश्वर, असें होईल तेव्हां स्वराज्य खरें ठरेल. गांवांत तुम्ही भांडणें करूं शकतां मग गांवांत च तीं मिटवूं शकत नाहीं काय? जे भांडखोर म्हणून जगांत प्रसिद्ध आहेत, अशा लोकांकडे आम्ही आमचीं भांडणें मिटविण्याला कां जावें? बेकारीमुळें चोरी होते. चोराला कोर्टांत शिक्षा दिली जाते. तेथें न्याय जोखला जातो. कोण जोखतात न्याय? जे त्यांच्यापेक्षा सवाई बेकार आहेत ते. ते कसलें हि उत्पादन करीत नाहींत. आणि ढीगभर पगार घेतात. त्या पगाराचें जगाला ओझें आहे. जेलर, न्यायाधीश, वकील हे सर्व बेकार आहेत. आम्ही जर भांडणें न केलीं तर त्यांना कांहीं काम च राहणार नाहीं. आम्ही आमचीं

भांडणें त्यांच्याकडे नेऊं लागलों, तर बेकारांची संख्या मात्र वाढेल. आम्हांला तेथें जाऊन न्याय मिळतो, हा हि एक भ्रम आहे.

आम्ही गांवांत भांडू, पण भांडण गांवाबाहेर जाऊं देणार नाहीं, याचें नांव आहे ग्रामराज्य. परंतु गांवांत भांडण च होणार नाहीं, याचें नांव आहे रामराज्य. आपलें भांडण शहरांत घेऊन जाणें गुलामगिरी आहे. सध्यां इतकें च झालें आहे की लंडनला जाण्याऐवजीं दिल्लीला जावें लागतें. पण यामुळें फार फरक झाला नाहीं.

'पांच मैलांवर पाणी होतें, तें एका मैलावर आलें आहे, शांत रहा,' असें एखाद्या तहानेलेल्या माणसाला तुम्ही सांगितलें तर तो तहानेलेला काय म्हणेल ? 'यानें माझे समाधान होत नाहीं, पाणी पांच बोटें दूर असलें तरी मला चालणार नाहीं. जेव्हां पाणी माझ्या घशांत जाईल, तेव्हां च माझें समाधान होईल,' असें तो म्हणेल. स्वराज्य दिल्लींत आलें आहे, मुंबईत आलें आहे, कटकला हि आलें असेल. पण आम्ही गांवोगांवीं आणि घरोघरीं स्वराज्य आणूं इच्छितों. हें खादी आणि ग्रामोद्योग यांशिवाय होणार नाहीं. जमिनीच्या वाटपाशिवाय होणार नाहीं. ग्रामदानाखेरीज होणार नाहीं. आणि आपलीं भांडणें आपल्या गांवांत मिटविल्याशिवाय होणार नाहीं.

---

**कुजेंद्री (कोरापुट) ओरिसा २५-९-१९५५**

REFBK-0009282

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८७३८ वि: निबंध
क्रमांक ९२८२ नों: दि: ७५/२१/६